आम्ही
# पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३१ वे | अंक सहावा | पृष्ठे ११ | जून २०२२ | www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92

या अंकात

पान ०२ — २१ वा पार्ले महोत्सव

पान ०४ — धार्मिक आणि सामाजिक कार्याची पंढरी : ऐश्वर्यसंपन्न मालवीय मार्ग !

पान ०५ — तुम्ही आत्तापर्यंत सर्वात मोठं पुस्तक म्हणजे किती मोठं पाहिलं आहे ?

पान ०६ — चित्रकार दीनानाथ दलाल चित्र आणि चरित्र



पान ९

एक पॅशनेट कलाकार ... योजना शिवानंद !

# पाटिविअ चा शताब्दी सांगता सोहळा संपन्न

'पार्ले टिळक सारख्या संस्था शैक्षणिक क्षेत्रात संपूर्ण महाराष्ट्राचं नेतृत्व करत असतात' असे गौरवोद्गार सोहळ्याचे प्रमुख पाहुणे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. उदय सामंत यांनी काढले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचित असलेल्या पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन आणि पार्ले टिळक विद्यालय मराठी शाळेने गत वर्षी १०० वर्षे पूर्ण केली. शताब्दी सांगता निमित्त संस्थेच्या १०१ व्या वर्धापनदिनी म्हणजे ९ जून २०२२ रोजी भव्य सोहळ्याचे आयोजन केले होते. सकाळी झालेल्या सत्रात मराठी शाळेचे माजी विद्यार्थी भारतीय हवाई दल प्रमुख (निवृत्त) श्री. प्रदीप नाईक, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. उदय सामंत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मराठी शाळेला १०० वर्षे पूर्ण झाली या निमित्ताने शाळेच्या प्रवेशद्वाराचे नूतनीकरण केले आहे तसेच १०० वर्षांचा इतिहास डिजिटल स्वरुपात शाळेच्या लॉबीमध्ये उपलब्ध करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांना संरक्षण दलात जाण्याची प्रेरणा मिळावी या हेतूने शाळेत एक विशेष 'शौर्य कक्ष' तयार करण्यात आलेला आहे. या सर्वांचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. संध्याकाळच्या कार्यक्रमात राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर हे उपस्थित होते. या वेळी शताब्दी गौरव ग्रंथाचे प्रकाशन राज्यपालांच्या हस्ते झाले. संस्थेच्या पार्ले येथील मराठी शाळेच्या भव्य प्रांगणात हा कार्यक्रम झाला. यासाठी भव्य मंडप आणि देखणा मंच उभारण्यात आला होता. या विशेष दिवसाचा शेवट संस्थेच्या विविध शाळातील आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन तयार केलेल्या समूह वादन, गायन, नृत्य आणि नाटक या अतिशय बहारदार कला गुण दर्शनाच्या कार्यक्रमाने झाला. पार्लेकरांसाठी हा सोहळा अत्यंत जिव्हाळ्याचा असल्याने या कार्यक्रमाला सर्वच क्षेत्रातील मान्यवर नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली.





छायाचित्र : अजय गोखले



## संपादकीय

कालच पार्ले टिळक विद्यालयाचा शताब्दी सांगता समारंभ दिमाखदार पद्धतीने साजरा झाला व दोन तीन दिवसात महिला संघाचा हीरक महोत्सव साजरा होणार आहे. पार्ल्यासाठी, पार्लेकरांसाठी व पार्ल्यात लहानाचे मोठे झालेल्या प्रत्येकासाठी ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. एखादी शिक्षणसंस्था सुरु करून ती इतकी वर्षे निष्ठेने चालवणे ही सोपी गोष्ट नव्हे. ज्या काळी ह्या संस्था जन्माला आल्या त्या काळी शिक्षण हा धंदा किंवा व्यवसाय झाला नव्हता. ते एक व्रत होते, ती एक प्रकारची देशसेवा होती. त्याच विचाराने इतकी वर्षे जेव्हा ज्ञानदानाचे पवित्र कार्य सुरु रहाते तेव्हाच एक सुशिक्षित, सुसंस्कृत समाज निर्माण होतो. पार्ल्यातील ह्या दोन अग्रगण्य संस्थांनी पार्ल्याची इतकी वर्षे अव्याहत सेवा केली आहे व एका अर्थाने पार्ले घडवले आहे. आज केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात पार्ले ‘शिक्षणाचे माहेरघर’ म्हणून नावाजले जाते ह्याचे मुख्य कारण म्हणजे पार्ले टिळक आणि महिला संघ ह्यासारख्या संस्था हे आहे.

कालानुरूप समाजातील सर्व गोष्टी बदलत जातात त्याच प्रमाणे शिक्षणाची उपयुक्तता, शिक्षण देण्याची पद्धत, विद्यार्थ्यांची आणि पालकांची मानसिकता ह्या गोष्टीसुद्धा बदलल्या आहेत. त्याची दाखल राज्यकर्त्यांनी, शिक्षणसंस्थांनी घेणे व शैक्षणिक धोरणात त्यानुसार बदल करत रहाणे ह्या गोष्टी अपेक्षित आहेत. ‘फक्त वर्गात शिकवले जाते तेच शिक्षण बाकी खेळ, गाणे, नाच, नाटक ह्या गोष्टी केवळ वेळेचा अपव्यय आहेत’ असे समजण्याचे दिवस आता राहिले नाहीयेत. आज पार्ल्यातील अक्षरश: हजारो मुले ह्या शिक्षण संस्थांमध्ये शिकत आहेत. एका अर्थाने पार्ल्याचे भवितव्य ह्या संस्थांच्या हातात आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यामुळे शाळेत घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर पार्लेकरांचे, पालकांचे बारीक लक्ष असते. शिक्षक कसे शिकवतात? मुलांना मारतात का? शाळेत खेळांना व इतर कलागुणांना वाव आहे का? इथपासून ते टॉयलेट्स साफ असतात का? कॅन्टीन मधील पदार्थांचा दर्जा कसा असतो? इथपर्यंत सर्व गोष्टींची समग्र चर्चा पार्ल्यात होत असते व ते सहाजिकच आहे.

एकेकाळी फक्त मराठीतून शिक्षण देणाऱ्या आपल्या शाळांमध्ये कालानुरूप इंग्लिश माध्यम व आता ICSE सुरु झाले आहे. खेळाचे व अभ्यासेतर उपक्रमांचे महत्वसुद्धा वाढले आहे. ह्यापुढेही असेच प्रगतिशील धोरण आपल्या शिक्षणसंस्था राबवतील व पार्ल्यातील विद्यार्थी जगभरात आपले, आपल्या संस्थेचे व पर्यायाने पार्ल्याचे नाव उज्ज्वल करतील ह्यात शंका असायचे कारण नाही!

आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
रोहित जाधव
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# २१ वा पार्ले महोत्सव

## पार्ले महोत्सव म्हणजे गुणी पार्लेकरांनी तरुणांना घडवण्यासाठी तयार केलेले व्यासपीठ - देवेंद्र फडणवीस

विलेपार्ले हे कला, संस्कृती, विचार व कल्पकता जोपासणारी गुणी लोकांची नगरी असून अशा सर्व मंडळींच्या प्रेरणेने तरुणांना घडविण्यासाठी तयार झालेले व्यासपीठ म्हणजे पार्ले महोत्सव, अशा शब्दात माजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महोत्सवाचे कौतुक केले. ते २१व्या पार्ले महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. प्रत्येक व्यक्तीस आपले पहिले बक्षिस हे प्रेरणा देऊन जाते व पार्ले महोत्सवात नेमकी अशीच प्रेरणा मिळत तरुणांना जीवनाची दिशाही मिळते असेही ते म्हणाले. यामुळे तरुण वर्ग या महोत्सवाची वर्षभर वाट पहात असतो असे सांगत हा महोत्सव दरवर्षी आयोजीत करावा असेही प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

मागील दोन वर्षात जरी महोत्सव घेता आला नसला तरी यावर्षी दोन वेळा पार्ले महोत्सव आयोजीत करु असे प्रमुख आयोजक आमदार पराग अळवणी म्हणाले. सन २०१९ मध्ये देवेंद्रजी फडणवीस यांच्या पुढाकाराने संपूर्ण राज्यभरात सी. एम. चषक आयोजीत करुन गावागावातील तरुणांना एक मोठे व्यासपीठ उपलब्ध करुन दिले होते याची आठवण त्यांनी करुन दिली.





पार्ले महोत्सवामधील स्पर्धेत भाग घेणाऱ्यांमध्ये ‘संघ भावना आणि खिलाडू वृत्ती’ निर्माण होते ज्याचा लाभ पुढील आयुष्यातही होत असेल. तसेच ‘तुम्ही जिंकाल किंवा शिकाल’ ही शिकवण या पार्ले महोत्सवातून गेली २० वर्षे प्रत्येक तरुणाई येथून शिकत आहे, असे प्रतिपादन खा. पूनम महाजन यांनी केले.



२१व्या पार्ले महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते प्रविण दरेकर यांचेही भाषण झाले. तसेच भाजपा विलेपार्लेचे अध्यक्ष मिलिंद शिंदे यांनी प्रास्तविक तर नगरसेविका ज्योती अळवणी यांनी आभारप्रदर्शन केले. सोहळ्यात भाजपा नेते रघुनाथ कुलकर्णी, जिल्हा अध्यक्ष सुषम सावंत, नगरसेवक अनिष मकवानी, अभिजीत सामंत, राजेश फुलवारीया, नगरसेविका सुनिता मेहता व स्वप्ना म्हात्रे उपस्थित होत्या.

यावर्षीचा मिनी पार्ले महोत्सव दिनांक १३ मे ते १७ मे २०२२ या कालावधीत पार पडला.



यामध्ये कबड्डी, व्हॉलीबॉल व क्रिकेट या तीन प्रमुख स्पर्धा घेण्यात आल्या होत्या व एकूण ३००० स्पर्धक सहभागी झाले होते. पार्लेकरांनीही दरवर्षीप्रमाणे महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महोत्सवामध्ये येणाऱ्या खेळांडूंचा उत्साह वाढविण्याकरीता ऑलंपीकमध्ये व्हॉलीबॉल या खेळात कांस्य पदक विजेती ब्रिना ब्रुट व व्हॉलीबॉल सिनियर भारतीय टिमचा कर्णधार अश्वल राय, बॉडीबिल्डर जॉन लुकास, अभिनेता अक्षय केळकर, अभिनेत्री कुंजिका काळविंट आणि दिग्दर्शक कृणाल राणे यांनी पार्ले




महोत्सवाला भेट देऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात भाजपा मुंबईचे अध्यक्ष आमदार मंगलप्रभात लोढा उपस्थित होते. त्यांच्याहस्ते विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरण करण्यात आले..

GOLDEN GATE TO IIT
"Making your dreams come true since 2005"

- **Target 2024 batch for std. X students** (ICSE, CBSE, IGCSE, SSC)
- A 2 year Online/Offline/Hybrid Group Tuition Programme from May 2022
- **Tri-pillar foundation** (Tried and tested pedagogy technique!)
  - **Sound Fundamentals:** Learn the concepts & their application
  - **Sufficient Practice:** Practice over and over till you achieve mastery
  - **Skill development:** Time & stress management, fault analysis etc.
- **Selected batch of 35** Don't feel lost in the crowd anymore!
- **Mentored 400+ students** to excel in academics since 2005
- **Single programme** for JEE (Adv. + Main), BITSAT, CET & XI, XII (HSC)
- **Guidance to choose among top-notch institutes** like IIT, NIT, IISER, BITS, DAIICT, ICT, VJTI, SPCE, SPIT, DJS, KJS & many others

Our Top Scorers : 2020 Batch
Abhishek Mungekar IIT Gandhinagar
Anokhi Mehta IIT Bombay
Mihir Dharap IIT Palakkad

Our Top Scorers : 2019 Batch
Shreyas Nadkarni IIT Bombay
Om Prabhu IIT Bombay
Atharva Varde IIT Guwahati
Omkar Nadkarni IIT Madras

Our Faculty
Mathematics: Prof. Vinayak Antarkar B.Tech IIT Bombay
Physics: Prof. Manoj Karmarkar M.Tech IIT Bombay; Prof. Indraneel Naik M.Tech NIT Trichy
Chemistry: Dr. U.R. Kapadi Ph.D. IIT Bombay; Prof. Tarun Ahirwar B.Tech ISM Dhanbad

Contact: Mr. Prashant 7039679129/ 9004607404, Dr. Kapadi 9867244891
Prof. Karmarkar 9930198249, Prof. Antarkar 9820651068
Address: Golden Gate to IIT, 107/B, Hemu Arcade, Vile Parle West, Mumbai, 400056

# टर्की मध्ये फडकली 'तंजावूर'ची पताका

टर्की येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सवात तंजावूर नृत्य शाळेच्या विद्यार्थिनींना उत्कृष्ट नृत्याविष्काराचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. याचे नेतृत्व तंजावूर नृत्य शाळेच्या संचालिका व ख्यातनाम भरतनाट्यम् नृत्यांगना तेजस्विनी लेले आणि ग्रीष्मा लेले यांनी केले. भरतनाट्यम् शैलीत भारतीय नृत्य पथकाने 'कुरुवंजी' ही परितोषिकेही पटकावली. यापूर्वी २०१५ साली इटली, २०१६ साली स्पेन व २०१७ साली बल्गेरिया येथील नृत्यमहोत्सवात त्यांनी तंजावूर नृत्यशाळेच्या चमूसह भाग घेतला होता. तिथे या शाळेला ३ पुरस्कार प्राप्त झाले होते.

कोविडमुळे झालेल्या मोठ्या गॅपनंतर प्रथमच त्यांनी या आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सवात सहभाग



नृत्यरचना सादर केली. ही रचना सादर करताना त्यात मराठमोळ्या लेझीमला गुंफून एक अभिनव FUSION सादर केले. या रचनेला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावर्षीही प्रथम पारितोषिक मिळवून तंजावूर नृत्यशाळेने HAT-TRICK साधली आहे. २०१५ पासून ही नृत्यशाळा सातत्याने आंतरराष्ट्रीय नृत्यमहोत्सवात सहभागी होत आहे. २०१७ पासून तंजावूर नृत्यशाळेने स्पर्धेतही सहभागी व्हायचे ठरवले आणि प्रत्येक स्पर्धेत घेतला. यामध्ये बल्गेरिया, तुर्की इत्यादी देशांनी सहभाग घेतला होता. युक्रेन-रशिया युद्धामुळे महोत्सव होईल कि नाही या बाबत खूपच काळजी वाटत होती.

तंजावूर नृत्य शाळेच्या ऐश्वर्या गद्रे , योहाना राजवाडे , पृथा मीठे , सई रानडे , गौरी गुंजाळ , प्रीथीका येदेरी , सांची शेट्टी , माही घुगे , स्नेहा सुभाष, आणि ख़ुशी नलावडे या १० मुली या महोत्सवात सहभागी झाल्या होत्या.

# अभिनंदन



पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम मधील इयत्ता ४ थी मध्ये शिकणारा प्रणय प्रशांत (प्रीति) पास्टे याने दिनांक २५ - २७ मे २०२२ दरम्यान नेपाळ येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत सहभाग घेतला होता. यामध्ये दहापेक्षा अधिक देशांनी आपला सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेमध्ये प्रणय प्रशांत (प्रीति) पास्टे याने कराटे मधील विविध इव्हेंटमध्ये भाग घेऊन आपल्या देशाला १ सुवर्ण पदक ३ रौप्य व ३ कास्य पदके अशा एकूण ७ पदकांची दमदार कमाई केली. त्याच्या या कामगिरीमुळे देशाचे, पार्ले टिळक विद्यालय तसेच पार्ले टिळक विद्यालय एसोसिएशनचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्वल केले आहे. या स्पर्धेसाठी श्री अरविंद चव्हाण, श्रीमती विभावली सापळे अशा आंतरराष्ट्रीय पदक विजेते व प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन त्याला लाभले.

आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये दमदार कामगिरीबद्दल प्रणयचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा !

---

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमातील २०११ च्या बॅचमधील विद्यार्थी रोहन कदम याने UPSC परीक्षेत AIR २९५ प्राप्त करून शाळेच्या व पार्ल्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. रोहनचे खूप खूप अभिनंदन व कौतुक.






# धार्मिक आणि सामाजिक कार्याची पंढरी : ऐश्वर्यसंपन्न मालवीय मार्ग !

एक किलोमीटरपेक्षा कमी लांबी असून सुद्धा धार्मिक आणि सामाजिक कार्यस्थळांनी गजबजलेला पार्ल्यामधील जर कुठला मार्ग असेल तर तो आमचा हा मालवीय मार्ग !

भोगले चौकामध्ये नेहरू मार्गाच्या डाव्या बाजूला मालवीय रोड सुरू होतो. सुरुवातीलाच डाव्या बाजूला १९२५ च्या ऑगस्टमध्ये सुरू झालेले पोस्ट ऑफिस आहे. अत्यंत देखणी,





कोकणी घराच्या धाटणीवर बांधलेली ही दगडी वास्तू जाणाऱ्या येणाऱ्याचे लक्ष वेधून घेते. साठे महाविद्यालयामध्ये जाणारी बरीच तरुणाई या मार्गाने ये-जा करत असते आणि कदाचित यामुळेच मालवीय रोडला नेहमीच अत्यंत चैतन्यमय वातावरण असते ! हा रोड मला नेहमी चिरतरूण वाटतो.

थोडे पुढे गेल्यावर जैन लोकांचे महावीरस्वामी जैन मंदिर (देरासर) आणि उपाश्रय आहे. जैन धर्मियांमध्ये मूर्तिपूजक देरावासी आणि मूर्ती न



पुजणारे स्थानकवासी असे दोन पंथ आहेत. या दोन्ही पंथांचे उपाश्रय येथे आहेत. उपाश्रय म्हणजे साधुसंत आणि भक्त मंडळी यांना तात्पुरते राहण्यासाठी बांधलेली निवासस्थाने. त्यामुळे या मार्गावर जैन साधुसंतांचा आणि भक्तांचा सतत




राबता असतो.

तसेच थोडे पुढे गेले की पार्क रोड मालवीय रोडला जेथे छेदून पुढे जातो, त्या कोपऱ्यावर डाव्याबाजूला सीताराम पुरुषोत्तम साठे उद्यान आहे. याला त्रिकोणी गार्डन असेही म्हटले जाते. हे कै. सीताराम पुरूषोत्तम साठे म्हणजेच विजय स्टोअर्सचे संस्थापक श्रीमान भाऊसाहेब साठे होत. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यामधील सुसेरी गावचे असलेले भाऊसाहेब वयाच्या अठराव्या वर्षीच पार्ल्याला त्यांच्या मामांकडे आले आणि पार्ले टिळक विद्यालयामध्ये प्राथमिक शाळेत शिक्षकाची नोकरी पत्करली. अनेक ठिकाणी नोकऱ्या करून सुद्धा त्यांच्या अंगची व्यवसाय कला त्यांना स्वस्थ बसू देईना. त्यांनी १९३३मध्ये पार्ल्यामध्ये किराणा मालाचे दुकान सुरू केले. तेच आपले विजय स्टोअर्स ! पार्ल्यामधील कितीतरी कुटुंबांचा विजय स्टोअर्सचा आणि पर्यायाने साठे कुटुंबियांचा गेल्या तीन-चार



पिढ्यांचा ऋणानुबंध आहे. भाऊसाहेबांच्या पार्ल्याच्या विकासासाठीच्या योगदानाची पोचपावती म्हणून मुंबई महानगरपालिकेने या त्रिकोणी उद्यानाला त्यांचे नाव दिले आहे.



या चौकामध्ये उजव्या बाजूला गेली कित्येक वर्षे एखाद्या छोटेखानी किल्ल्यासारखी दिसणारी शिवसेनेची शाखा दिमाखात उभी आहे. रेल्वे स्टेशन वरून आलेली तरुणाई या चौकातच उजवीकडे वळण घेऊन साठ्ये कॉलेजकडे जाते. पुढे उजव्या बाजूला लक्ष्मिबेन धरमशी कर्सन गाला हे डोळ्यांचे रुग्णालय आहे. जैन धर्मियांच्या सेवाभावी प्रवृत्तीचा एक उत्तुंग मापदंड म्हणून या रुग्णालयाकडे पाहिले जाते. अत्यंत वाजवी मूल्यामध्ये डोळ्यांचे उपचार येथे केले जातात.

त्याला लागूनच रुइया कुटुंबियांचा हरिनिवास हा एक अतिशय देखणा असा बंगला आहे. एकेकाळी पार्ल्यामध्ये जे अनेक प्रासादतुल्य बंगले होते त्यापैकी १९२८ साली बांधलेला हरिनिवास हा एक.

मालवीय रोडचं सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या मार्गावर या रुइया बंगल्याच्या थोडे पुढे, डाव्या बाजूला असलेला अजमल रोड आणि तेथे एकेकाळी राहात असलेलं महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व- आपले पुलं. !! पुलंचे आजोबा श्री. वामन मंगेश दुभाषी जेव्हा जोगेश्वरीहून विलेपार्ले येथे आले, तेव्हा त्यांच्या शेजारीच पुलंच्या वडिलांनी पण एक घर बांधले. त्याचे नाव त्रिंबक सदन.

वामन मंगेश दुभाषी हे एक बहुश्रुत आणि विलेपार्ल्यामधील आदरणीय व्यक्तिमत्व होते.

ते ऋग्वेदी या टोपण नावाने लेख लिहीत असत. पुलंचे घर आणि त्यांच्या आजोबांचे घर याच्यामध्ये फक्त एक गल्ली होती, अजूनही आहे. आता दोन्ही घरे जाऊन तेथे इमारती झाल्या आहेत. त्रिंबक सदन येथे आता पुलंचे पुतणे श्री जयंत देशपांडे आणि इतर नातेवाईक राहतात.

अजमल रोडला मालविया रोडचा एक उपमार्ग



म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल, इतका तो लहान आहे. या अजमल रोडला पूर्वी डंबेल रोड असे म्हटले जायचे. कारण त्याचा आकार एखाद्या डंबेल्स सारखा आहे. अशा प्रकारचा वैशिष्ट्यपूर्ण आकार असलेला हा जगातला कदाचित एकमेव मार्ग असावा. याच मार्गावर उपासनी महाराजांचे मंदिर आहे.

पुढे डाव्या बाजूला विलेपार्ले उपनगरामधील एक मोठी आणि महत्त्वाची सहकारी गृहनिर्माण संस्था गोमंतक आणि त्यांचे मंगल कार्यालय आहे. पुढे काही अंतरावरच मालवीय रोड महंत रोडला मिळता मिळता समाप्त होतो, त्या कोपऱ्यावर उत्कर्ष मंडळ ही अत्यंत प्रसिद्ध अशी सामाजिक संस्था आहे. गायन, वादन, योगा वगैरेचे क्लासेस, मंगल कार्यालय आणि अशा इतर अनेक घडामोडी तेथे सतत सुरू असतात.

मालवीय रोडला आम्ही आमच्या शीर्षकामध्ये ऐश्वर्यसंपन्न मार्ग असे म्हटले आहे. याचे कारण असे की, पूर्व पार्ल्यामधील अनेक लक्ष्मीवंत या मार्गावर राहतात. ताश्कंद साडी स्टोअर्सचे मालक, सुंदरम बुक्सचे मालक आणि असे इतर अनेक, म्हणजे जवळजवळ पन्नासच्या वरती उच्चभ्रू लोक या मार्गावर राहतात. त्या दृष्टीने पाहता मालवीय मार्गाला कोट्याधिशांचा मार्ग असे म्हटले तरी वावगे ठरू नये !

**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५






# तुम्ही आत्तापर्यंत सर्वात मोठं पुस्तक म्हणजे किती मोठं पाहिलं आहे ?

आसपास

तुम्ही भा.रा. भागवतांचं 'मायापूरचे रंगेल राक्षस' वाचलं आहे का? त्यात पहिल्याच प्रकरणात जानू शेतकऱ्याचं संपूर्ण शेत व्यापून टाकणाऱ्या, सर्व राक्षस कुळांचा इतिहास असलेल्या पुस्तकाचं वर्णन आहे. भागवतांना ही कल्पना कदाचित मंडालेतल्या कुथोडा पागोडाच्या आवारातल्या त्रीपिटका ह्या बौद्ध धर्मातल्या पवित्र शास्त्रवचनांच्या पुस्तकावरूनच सुचली असेल. कारण साधारण पुरूषभर उंच आणि दोन हात रूंदीची अखंड संगमरवराची शिळा म्हणजे एक पान, ह्या प्रत्येक पानावर पाठपोट ८०-१०० ओळी कोरलेल्या आणि अशी ७२९पानं नजर पोचेल तेथपर्यंत एका मैदानावर पसरलेली, असं हे पुस्तक आहे! हे पुस्तक संपूर्ण वाचण्यासाठी काही मैलांचा फेरफटका मारावा



लागतो. म्हणजे बुद्धीविकास आणि शारीरिक तंदुरुस्ती असे एका दगडात दोन पक्षी! जर हे पुस्तक कागदावर छापलं तर ४०० ऑक्टेवो आकाराच्या पानांचा एक, असे ३८ खंड भरतील!


एकोणिसाव्या शतकात म्यानमारचा राजा मिन्दोन आपलं राज्य ब्रिटीश आक्रमणापासून वाचवायला झगडत असताना हे जगातलं सर्वात मोठं पुस्तक बांधलं गेलं. त्यावेळेपर्यंत ब्रिटीश फौजांनी दक्षिण म्यानमार जिंकून, लुटून उध्वस्त केला होता आणि उरलेल्या आपल्या राज्याचीही अशीच वाताहत होणार हे मिन्डोनला कळून चुकलं होतं. तेव्हा आपल्या धर्माचा सर्वात पवित्र वारसा अविनाशी स्वरूपात कायमचा टिकावा



अशा काहीश्या विचारातून ह्या पुस्तकाची निर्मिती झाली असावी.

आजही कुथोडा पागोडाच्या आवारात नजर पोचेल तेथपर्यंत रेखीव रांगांमध्ये बांधलेल्या सुंदर शुभ्र घुमट्या, प्रत्येक घुमटीमध्ये एक भव्य वळणदार अक्षरं कोरलेलं पान असं हे थक्क करणारं दृष्य पाहायला मिळतं. (पहिला फोटो) त्या कोरलेल्या अक्षरांत एकेकाळी भरलेलं सोनं मात्र ब्रिटीश सैनिकांनी लुटून नेल्यामुळे आज त्यात काळा रंगच फक्त दिसतो!

म्यानमारमधला आणखी एक चमत्कार म्हणजे बर्मा टीक नावाने प्रसिद्ध असलेलं लाकूड. गीतेमध्ये आत्म्याचं वर्णन करताना म्हटलं आहे - 'न चैनं क्लेदयन्त्यापो, न शोषयति मारुत:!' हे बर्मा टीकचंच वर्णन आहे. उन, पाउस, वारा इतकच काय वाळवीसुध्दा त्यावर शतकानुशतकं काहीही परिणाम करु शकत नाही. आजही संपूर्णपणे ह्या लाकडाने शेकडो वर्षांपूर्वी बांधलेल्या भव्य इमारती टिकून आहेत. उदाहरणार्थ दुसऱ्या फोटोतला मिन्दोन राजाचा महाल. संपूर्णपणे लाकडात बांधलेली ही ५ मजली इमारत आज २५० वर्ष उभी आहे. आज त्यात श्वेनानडाव नावाचा मठ आहे किंवा हे शेवटचे २ फोटो पहा - महामुनी बुद्ध



पागोड्यातल्या लाकडात कोरलेल्या कमानी – दीडदोनशे वर्ष जुन्या!



वयाच्या साठीपर्यंत मला म्यानमार बद्दल फक्त दोनच गोष्टी माहित होत्या. लोकमान्य टिळकांचा मंडाले येथील कारावास ही एक आणि ब्रह्मदेशाचा राजा थिबाची रत्नागिरीत मरेपर्यंत



नजरकैद, ही दुसरी.

पण बौद्ध धर्माचा प्रभाव आणि स्थानिक संवेदनांच्या संगमातून तिथे निर्माण झालेला ह्या त्रीपिटका ग्रंथासारखा कलाविष्कार पाहण्यासाठी दोन आठवडेसुद्धा पुरणार नाहीत असं कधीच वाटलं नव्हतं. खरं तर जे थोडं फार मी पाहिलं तेव्हढच सांगायला आणखी ५ लेख सुद्धा कमी होतील. पण पुढच्या वेळी आपण सातासमुद्रापार पेरू आणि बोलीव्हिआला भेट देऊ.



**सतीश जोशी**
९८२०२२८२७९

# फ्लोरा फाऊंटन

जुन्या मुंबईच्या मुख्य रस्त्यांवर दिमाखात उभे असलेले अनेक जुन्या ब्लॅक ॲण्ड व्हाईट हिंदी चित्रपटात बघताना लक्ष वेधून घेणारे फ्लोरा फाऊंटन हि मुंबईची गेट वे ऑफ इंडियाप्रमाणेच एकेकाळची ओळख होती.मुळातच कारंजे हे सौंदर्याचे, उत्साहाचे, आनंदाचे आणि सतत




कार्यरत रहाण्याचे प्रतिक. अविरत धावणाऱ्या मुंबईसाठी याहून यथायोग्य प्रतीक कोणते असणार ?

श्री. आर. नार्मन शॉ यांची ही कलाकृती. उत्तम प्रतीच्या पोर्ट लॅड पाषाणातून जेम्स फोर्साईथ या शिल्पकाराने तिला घडवले ते व्हिक्टोरिया गार्डन म्हणजेच आजच्या जिजामाता उद्यानात बसवण्यासाठी.पण त्यानंतर सन १८६९ साली सर बार्टेले फ्रिअर यांच्या सन्मानार्थ त्याकाळात ९००० पौंड स्टर्लिंग खर्चून बनवलेले हे कारंजे मुंबई शहराच्या मुख्य रस्त्यांच्या प्रशस्त चौकात बसवायचे ठरले.याच ठिकाणी पूर्वीच्या जुन्या किल्ल्याचे पश्चिमद्वार चर्चगेट होते. सेंट थॉमस चर्चकडे जाण्याचे दार म्हणून ते चर्चगेट या नावाने ओळखले जाई. सभोवार सुंदर उद्यान असलेले हे कारंजे मुंबईची शान होती.

१९६० साली या कारंज्याच्या शेजारीच राज्य सरकारने हुतात्मा स्मारक उभारले व या चौकाचे नामकरण हुतात्मा चौक असे केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्राणांचे बलिदान देणाऱ्याच्या सन्मानार्थ हे उभे केले गेले. त्यामुळे स्वतंत्र उभ्या असलेल्या फ्लोरा फाऊंटनची शोभा कमी झाली. प्रमुख रस्त्यांच्या केंद्रस्थानी उभे राहून दृष्टीपथात येणारी दूरवरची दृश्येही आता नीट दिसत नाहीत. रहदारीलाही पूर्वीचा मोकळेपणा राहिलेला नाही कारण दोन्ही स्मारकांभोवती वाहनतळ उभारला आहे. वाढणारी रहदारी,फेरीवाल्यांनी व्यापलेले रस्ते, सुशोभीकरणाच्या नावाखाली फ्लोरा फाऊंटनला दिलेला भडक पांढरा रंग आणि जाहिरात फलक याने मूळ शिल्पाचे सौंदर्य झाकोळून गेले आहे. त्याचा मूळ पाषाणाचा नैसर्गिक रंग मारून टाकला आहे.त्यातच आता आंदोलन, मोर्चेकरी यांनी हा भाग सतत व्यापलेला असतो. त्यामुळे अतिशय सुंदर अशा या परिसराचे व शिल्पाचे देखणेपण लयाला जाते आहे. पण आजही शिल्पकलेचे भोक्ते कोळशातील असे हिरे शोधत रहाणारच.

**संगीता बेहेरे**
९८६७७५८३१०

**(फोर्टमध्ये फिरताना - भालचंद्र हर्डीकर)**



# चित्रकार दीनानाथ दलाल चित्र आणि चरित्र

शालेय जीवनात ब. मो. पुरंदरे लिखित शिवचरित्र वाचण्यात आलं त्यातली शिवाजी महाराजांचा जीवनपट उलगडणारी लोभस, मोहक, त्यावेळचे प्रसंग जिवंत उभी करणारी दीनानाथ दलालांची चित्रे पाहून आपण पण चित्रकार व्हावे, कमीत कमी सराव करून चित्रे काढण्याचा आनंद घ्यावा असं वाटणारी मुलं प्रवृत्त झाली. त्यानंतर जिथे मिळेल तिथून दलालांची चित्रे पाहणे, रेखाटनांचा आनंद घेणे, अद्भुत रंगलेपनाचं आश्चर्य वाटून दलालांची चित्रे जमा करणे असा छंदच मला लागला.


पुढे कमर्शिअल आर्टला गेल्यावर मी थोडासा व्यंगचित्र कलेकडे पण वळलो. आवाज ह्या विनोदी वार्षिकासाठी व्यंगचित्रे करतांना आवाजसाठी चक्क घडीचित्रकल्पना पण मी रेखाटली. आवाजच्या संपादकांना आर्टस्कूलच्या दिवसात ती दाखवण्याचं धाडस केलं. आवाजचे संपादक मधुकर उर्फ भाऊ पाटकरांनी ती पाहून ठेवून घेतली, चार दिवसांनी या - मग बघू असं सांगितलं. चार दिवसांनी भीत भीत मी त्यांच्याकडे गेल्यावर भाऊ पाटकर म्हणाले, ''तुमचं चित्र मुखपृष्ठासाठी निवडलंय''. मी उडालोच. बाप रे! आता हे फायनल कसं करुया साईज वगैरे विचारतांच ते म्हणाले हे मुखपृष्ठ चित्र फायनल स्वरूपात दीनानाथ दलालच करणार. आवाजची मुखपृष्ठपूर्वी बाळासाहेब ठाकरे करीत असत. मार्मिक काढल्यानंतर आवाज मुखपृष्ठ फक्त दलालच करत आहेत आणि तेच करणार. मी थोडा हिरमुसलो. पण प्रभुदेसाई तुमचं नाव मुखपृष्ठ कल्पना म्हणून दलालांनंतर श्रेयनामावलीत असेल असं पाटकरांनी सांगितल्यावर मुठभर ऐवजी मणभर मांस चढलं. पुढे पाटकरांनी मला मुद्दामून मुखपृष्ठ दलालांनी रेखाटल्यानंतर एका भेटीत सांगितलं तुमचं रफ-स्केच बघून दलालांनी अभिप्राय दिलाय 'प्रॉमिसिंग लाइन' आहेत ह्या नविन चित्रकाराच्या. साक्षात दलालांसारख्या महान चित्रकाराच्या अभिप्रायवजा आशिर्वादांनी माझे कलाजीवन उजळून निघाले. दुर्दैवाने दीनानाथ दलालांच अकाली निधन झाले. अफाट चित्रांचा खजिना ते सोडून गेले. प्रकाशन विश्वात मोठ्ठी पोकळी निर्माण झाली. लोभस, मोहक रंगलेपनाचे अद्भुत आविष्कार करणारी चित्रे रेखाटणे, शिवाय त्यांच्याबद्दलची माहिती पण कित्येक वर्षे उपलब्ध नव्हती मात्र २००६ साली दलाल आर्ट फाऊंडेशनतर्फे ज्योत्स्ना प्रकाशनातर्फे - एक देखणे पुस्तक दीनानाथ दलालांवर प्रसिध्द झाले. त्यानंतर आता नुकतेच परिपूर्ण म्हणता येईल असा सुहास बहुळकर लिखित चित्र आणि चरित्र दीनानाथ दलाल असा ग्रंथ राजहंस प्रकाशनातर्फे प्रकाशित झालाय. अक्षरश: झपाटल्याप्रमाणे त्यावर अचाट श्रम, कष्ट, संशोधन करून अतिशय देखणा, अभिरुची संपन्न, दलाल प्रेमींसाठी, चित्रांवर प्रेम करणाऱ्यांसाठी, चित्र रेखाटण्याचा छंद जोपासणाऱ्यांसाठी, शिकाऊ चित्रकारांसाठी वरदान ठरणारा हा ग्रंथ सुहास बहुळकरांनी लिहिला आहे. निर्माण केलाय. अर्थात त्यासाठी अनेकांचे अदृश्य, दृश्य हात सहाय्यभूत झालेत. तसं सुहास बहुळकरांनी सुध्दा मान्य केलाय.

सुहास बहुळकर हे स्वत: उत्तम चित्रकार आहेत. चित्रकारी बरोबरच अनेक मोठे महत्त्वाचे प्रोजेक्ट, संशोधनपर लिखाण त्यांनी केलय. दृश्यकला कोश, संकलन, संपादन अनेक पुरस्कार त्यांना लाभलेत. हा ग्रंथ परिपूर्ण करण्यासाठी त्यांनी दीनानाथ दलालांचं बालपण, कलाशिक्षण, स्केचिंग, रफ स्केचिंग, दीपावली वार्षिक आणि मासिक स्वरूपात प्रकाशन, दलाल आर्ट स्टुडिओ, प्रकाशन क्षेत्रातली अनेक मुखपृष्ठ, रेखाचित्रणे छत्रपती शिवाजी महाराजाच्या दरबाराचे मोठे तैलचित्र त्यामागची कहाणी, त्यांची अर्कचित्रे, व्यंगचित्रे, समकालिन चित्रकारांची दलालांविषयी मते, कुटुंब वत्सल दीनानाथ दलाल, त्यांचे व्यावसायिक कलावैविध्य, धी गोवा हिंदु असोसिएशन संस्थेशी त्यांचे ऋणानुबंध, तसेच दलालांचं इतकं चित्र साम्राज्य निर्माण करतांना अधुरं स्वप्न की इतकी अफाट चित्रे करूनसुध्दा अभिजात चित्रकलेत मनासारखं काम करू न शकणे आदी विषयांना स्पर्श केलाय ते मुळात ग्रंथ वायन करूनच प्रत्यक्ष आनंद मिळवावा. परंतु सर्वात माझ्या दृष्टीने बहुमोल असं जे लिखाण ह्या ग्रंथात सुहास बहुळकरांनी केलय त्याला तोड नाही. ते म्हणजे व्यावसायिक कलावैविध्य ह्यावर लिहितांना दलालांच्या चित्रांचं रसग्रहण केलय. ज्या आत्मियतेतून, सूक्ष्म बारकाव्यांसकट (त्यात त्यांच्यातला प्राध्यापक पण डोकावतो) ज्या पध्दतीने ते रसग्रहणात्मक वर्णन करतात, ते चित्र पाहून चित्रांचे रेखाटन, रेषेची लय, रंगलेपणातली सहजता, त्यातले नवनविन प्रयोग इतके सुलभपणे समजावतात की ते वाचून दलालांचे चित्र, त्यावरचे सुहास बहुळकरांचं रसग्रहण वाचून एखादा चित्रकार तयार होऊ शकेल. चित्रकलेमधे थोडी अंगभूत कला असेल तर तरबेज होऊ शकेल. मी स्वत: त्यांच्या ह्या रसग्रहणाने भारावून गेलो. चित्र कसे पहायचे, त्यातली वैशिष्ठ्ये, सूक्ष्म बारकावे कसे आत्मसात करता येतील ते वारंवार पाहून आनंदास्वाद कसा घ्यायचा हा वस्तुपाठच त्यांनी दिलाय.

सुसंस्कृत कलासक्त मराठी कुटुंबात जसे ज्ञानेश्वरी, तुकारामांचे अभंग गाथा, रामदास स्वामींचा दासबोध भक्तीभावाने संग्रहीत केली जातात; ज्ञानेश्वरीतल्या ओव्या, अभंग, गाथा, दासबोध, मनाचे श्लोक आदींचा आनंद घेतला जातो; तसाच हा दीनानाथ दलाल चित्र आणि चरित्र ग्रंथ प्रत्येक चोखंदळ, सुसंस्कृत मराठी कुटुंबात विराजमान असावा. वेळोवेळी दलाल ह्या महान चित्रकारांच्या चित्रकृतीचे स्मरण व्हावे, चित्रानंद घ्यावा, चित्रास्वाद घेतांना रंगून जावे, जमले तर त्यांच्या चित्राप्रमाणे रेखाटण्याचा सराव करावा, रंगकाम करून चित्रकारीचा आनंद घ्यावा असं मला वाटतं.

सुहास बहुळकरांनी हा ग्रंथ लिहून तसेच राजहंस प्रकाशनाने हा ग्रंथ प्रकाशित करून अवघ्या मराठी रसिकांना उपकृत करून ठेवलय.

**श्रीनिवास प्रभुदेसाई**
**९८६९० ६७०३५**









## श्री. माधवराव भागवत हायस्कूल (मराठी माध्यम)

# आमच्या शाळेचे हीरक महोत्सवी वर्ष २०२१-२२

**''अग्रत: पथि सदैव गम्यताम्'' या श्रीराम रक्षेतील ब्रीद वाक्याने**

श्री. माधवराव भागवत हायस्कूल (मराठी माध्यम) या आमच्या शाळेची स्थापना १९६१ साली झाली. २०२१-२२ हे शैक्षणिक वर्ष शाळेचं हीरक महोत्सवी वर्ष. गेल्या साठ वर्षांचा शाळेच्या प्रगतीचा चढता आलेख केवळ पार्ल्याने नव्हे तर उभ्या मुंबईने पाहिला. या प्रदीर्घ काळात शाळेने नेत्रदीपक यश मिळविले.

केवळ शैक्षणिक नव्हे, तर सांस्कृतिक, क्रीडा, सेवा, कला क्षेत्रात इतकी उत्तुंग भरारी मारत आलेली आहे. त्यामुळे हे हीरक महोत्सवी वर्ष कसं साजरं करावं याची चर्चा शाळेच्या मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यामध्ये सुरु झाली. कोविड-१९ मुळे लॉकडाऊन असल्यामुळे आम्ही शाळेत प्रत्यक्ष जाऊ शकत नव्हतो.






त्यामुळे ऑनलाईन गुगल मिटिंग्स सुरु झाल्या आणि हीरक महोत्सवी वर्ष कसं साजरं करावं याची एक ठोस रुपरेखा ठरली.

शाळेचे विद्यार्थी आणि पालक यांच्यासाठी काही स्पर्धा घेण्याचे निश्चित झाले. अर्थात, बऱ्याच अंशी या स्पर्धा ऑनलाईन घेण्याचे ठरले. विद्यार्थ्यांचे इयत्तांनुसार तीन गट पाडले. पहिला लहान गट इयत्ता ५वी व ६वी साठीचा, नंतर दुसरा गट इयत्ता ७वी व ८वी चा आणि तिसरा मोठा गट इयत्ता ९वी व १०वीचा. पालकांचा एकच गट ठरविला गेला.

आमची शाळा सहशालेय उपक्रमांसाठी प्रसिद्ध आहे. तसेच कला व साहित्याची जोपासना व्हावी यासाठी देखील शाळेतील शिक्षक धडपडत असतात. त्यामुळे घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी साधनीभूत व्हाव्यात असा विचार मांडला गेला. अगोदरचं वर्ष लॉकडाऊन मध्ये गेल्यामुळे विद्यार्थी संपर्क फारच कमी झाला होता. त्यामुळे अशा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थी विकासासाठी फार छान संधी मिळेल असं वाटलं आणि ते नंतर फलद्रूप देखील झालं.

या हीरक महोत्सवी वर्षाचा उद्घाटन समारंभ गुरुपौर्णिमेच्या दिवशी दि. २३ जुलै २०२१ रोजी संपन्न झाला ज्यामध्ये महिला संघाचे पदाधिकारी आणि शिक्षक उपस्थित होते.

शैक्षणिक विकासासाठी निबंध स्पर्धा आणि हस्ताक्षर स्पर्धा घेतली. त्यांचे विषय सद्य परिस्थितीनुसार ठेवले. उदाहरणार्थ, कोव्हिड १९ लसीकरण काळाची गरज, ऑनलाईन शाळा म्हणजे... मोबाईल शाप की वरदान इत्यादी. निबंध स्पर्धा मराठी व हिंदी या दोन्ही भाषांमधून झाली.

साहित्य गुणांना वाव देण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा आणि कविता वाचन स्पर्धा ठेवल्या. त्यांचेही विषय असेच कालानुरुप ठेवले. उदा. आणि लॉकडाऊन झाला.. कविता वाचन स्पर्धेचा दिवस तीन सप्टेंबर असल्यामुळे त्यासाठी ' पावसावरील कविता ' असा विषय निवडला.

सादरीकरण कलेसाठी (Performing Art) सोलो डान्स आणि एकपात्री अभिनयाच्या स्पर्धा घेतल्या. यामध्ये सोलो डान्सची स्पर्धा



सरकारी नियम पाळून प्रत्यक्ष घेतली गेली जिला खूप चांगला प्रतिसाद मिळाला.

चित्रकला आणि हस्तकला या विद्यार्थ्यांच्या खास आवडीच्या विषयांच्या स्पर्धा ऑनलाईन स्वरुपात घेतल्या ज्यांना फारच चांगला प्रतिसाद मिळाला. चित्रकलेसाठी ऑनलाईन शिक्षक बरे की वाईट किंवा लॉकडाऊन सुरक्षितता असे अत्यंत बोलके विषय घेतले.

हस्तकलेमध्ये 'टाकाऊ पासून टिकाऊ ' या समाजोपयोगी विषयाचा अंतर्भाव केला. वस्तू बनवतानाचे दोन मिनिटांचे विडिओज विद्यार्थ्यांनी पाठविले.

पालकांसाठी 'फळभाज्या सजावट स्पर्धा ' ही अत्यंत अभिनव स्पर्धा घेतली ज्यामध्ये पंचवीस पालकांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. त्यांचेही विडिओज शाळेला पाठविले गेले ज्यांचे



नंतर मूल्यमापन परीक्षकांनी केले.

या स्पर्धांच्या बरोबरीनेच या हीरक महोत्सवी वर्षात शिक्षक दिनाचे औचित्य साधून दि. ४ सप्टेंबरला शिक्षकांसाठी एका चर्चासत्राचे आयोजन केले गेले ज्याचा विषय होता – 'मराठी शाळांची गुणवत्ता कशी वाढवता येईल?' या चर्चासत्रात सहा शाळांमधील शिक्षकांनी सहभाग घेतला. या चर्चासत्राच्या अध्यक्षा सन्मा. श्रीम. अनुराधा गोरे होत्या. अशा विविध प्रकारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीकोनातून शाळेने निरनिराळ्या स्पर्धांचं आयोजन केलं. या सर्व उपक्रमांसाठी शाळेच्या सन्मा. मुख्याध्यापिका श्रीम. शुभदा वाघ आणि सन्मा. पर्यवेक्षिका श्रीम. गौरी सावंत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. महिला संघाचे कृतिशील सहकार्य आणि प्रोत्साहन मिळाले. शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ''एकमेकां साह्य करु, अवघे धरु सुपंथ'' या उक्तीनुसार हा जगन्नाथाचा रथ यथाशक्ती चालविला. विद्यार्थी, पालकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद स्पृहणीय होता. शाळेतील व शाळे बाहेरील शिक्षक आणि परिक्षकांनी मोलाचे सहकार्य या हीरक महोत्सवासाठी दिले. त्यांचे शतश: धन्यवाद !

आता रविवार दि. १२ जून, २०२२ रोजी सकाळी १०.३० वा. शाळेच्या प्रशस्त सभागृहात 'माजी शिक्षक-विद्यार्थी स्नेह मेळावा ' संपन्न होणार आहे जो या हीरक महोत्सवी वर्षाचा शेवटचा कळसाचा कार्यक्रम असेल.

**शिक्षक, टीम :**
**श्री. माधवराव भागवत हायस्कूल**



# हीरक महोत्सवाच्या निमित्ताने

**श्री माधवराव भागवत हायस्कूल मराठी माध्यम शाळेला साठ वर्षे पूर्ण झाल्याचे निमित्त साधून शाळेतील उपक्रम - कार्यक्रम यांचा परिचय करुन देणारा विशेष लेख**

साठ वर्षे तसे बघायला गेले तर हा एका पिढीचा काळ आहे. पण एका संस्थेसाठी हा काळ खूप मोठा व स्थित्यंतराचा असतो. शिक्षण क्षेत्रातील संस्थेसाठी हा काळ पन्नास पिढ्यांचा आणि हजारो मनांचा होतो. म्हणूनच या प्रसंगी थोडे मागे वळून मागचा आढावा घेणे व थोडे पुढे डोकावून भविष्याचा आवाका पाहणे आवश्यक असते.




श्री. माधवराव भागवत हायस्कूल - मराठी माध्यम या शाळेचे २०२१ - २२ हे हीरक महोत्सवी वर्ष विलेपार्ले व आसपासच्या परिसरातील आर्थिकदृष्ट्या मागे असणाऱ्या घटकांसाठी शिक्षण सहज शक्य व्हावे, ह्या हेतूने स्व. मंगलाताई आणि माधवराव भागवत या दांपत्याने विलेपार्ले महिला संघ हा संस्थेचा पाया रचला आणि प्राथमिक, नंतर माध्यमिक, पुढे महाविद्यालयीन अशा शिक्षणाच्या विविध पातळ्यांवर संस्थेने आपले पाय घट्ट रोवले. संस्थेच्या विद्यमान विश्वस्त अनिताताई भागवत आणि त्यांची पूर्ण कार्यकारिणी आज संस्थेला अधिकाधिक विकसित करीत आहे.



श्री माधवराव भागवत हायस्कूल या मराठी माध्यमच्या शाळेतून असंख्य विद्यार्थी घडून आज देशात, परदेशात विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत याचा अर्थातच शाळेला अभिमान आहे. सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण व चांगल्या संधी मिळाव्यात, अशा भावनेतून शाळा चाललेली आहे याचे प्रत्यंतर शाळेच्या जुन्या इमारतींचे अष्टकोनी वर्ग देतील. आजच्या नव्या इमारतीत ही अष्टकोनी रचना नसली तरी कालानुरुप दृकश्राव्य माध्यमे व आधुनिक तंत्र साधनांचा अध्ययन -अध्यापनात आवर्जुन उपयोग केला जातो.

आपल्या संस्कृतीची, समाजात विविध परंपरांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी शाळेत आषाढी एकादशी, गणपती सारखे अनेक उत्सव साजरे केले जातात. ग्रंथ व रोपे यांच्या दिंड्या काढल्या जातात. ध्वनिक्षेपकांवर सण-उत्सव, राष्ट्रीय महत्वाचे दिन यांच्या प्रसंगी कार्यक्रम केले जातात. विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना वाव मिळण्यासाठी वर्षभर वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्या जातात. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना विकसीत करण्यासाठी आणि त्यांना व्यावसायिक दर्जाचा कलानुभव मिळण्यासाठी शाळेचा वार्षिकोत्सव दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहासारख्या व्यावसायिक नाट्यगृहात केला जातो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना त्यांचे योग्य कार्यक्षेत्र निवडण्यासाठी माहितीपट, मार्गदर्शनपट काव्यांकाचे आयोजन केले जाते. त्यांना त्यांच्या आवडीला विलासेला खत पाणी घालता यावे यासाठी शाळेत विज्ञान, निसर्ग, वाङ्मय, कला सारखी मंडळे स्थापन केली जातात. आपापल्या आवडी व इच्छेप्रमाणे विद्यार्थी या मंडळांचे स्वेच्छेने सभासद होतात.

विद्यार्थी अभ्यास, कला, कौशल्य यांसोबत क्रीडा क्षेत्रातही मागे राहू नयेत याची दक्षताही शाळा घेते. कॅरम, बुद्धीबळ अशा बैठ्या खेळांसोबत लंगडी, कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल लेझीम या खेळातही शाळा आघाडीवर असते. शाळेचा कबड्डी व व्हॉलिबॉल या खेळांचा संघ व लेझीम पथक आहे. शाळेचे विद्यार्थी शालेय - आंतरशालेय अशा विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत असतात. वक्तृत, निबंध, एकपात्री अभिनय, समुहगायन, काव्यवाचन, चित्रकला अशा विविध स्पर्धांमध्ये शाळेचे विद्यार्थी वर्षभर शाळेचे नाव उंचावत असतात.



विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त व जबाबदारीची जाणीव विकसित होण्यासाठी शाळेत शिस्त व जबाबदारी यांना महत्व देणारे मंत्रीमंडळ कार्यरत आहे. वर्ग पातळीवर निवडणुका होऊन विद्यार्थ्यांतूनच मंत्री व पंतप्रधान, उप पंतप्रधान निवडले जातात आणि त्यांच्याकडे शिस्त पालनाची जबाबदारी दिली जाते. याच जबाबदारीचा आणखी एक भाग म्हणून शिक्षक दिनी इ. दर्जाचे विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक, लिपिक, शिपाई बनून एक दिवस शाळा चालविण्याचा अनुभव घेतात.

शिक्षणाच्या या सर्व प्रवासात विद्यार्थ्यांना काहीही अडचण येऊ नये यासाठी शाळा नेहमी प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांनी त्यांचे ज्ञान अद्ययावत करावे, यासाठी शाळेच्या ग्रंथालयासोबत संगणक, इंटरनेट या गोष्टीही विद्यार्थ्यांच्या दिमतीला हजर आहेत. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रत्येक शिक्षक दक्ष असतोच, त्याचसोबत विशेष समुपदेशकही शाळेत आहे. विद्यार्थ्यांच्या कोणत्याही अडचणींवर मात करण्यासाठी पालकांचीही यात विशेष साथ, वैयक्तिक संपर्क घेतले जातात. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश, शुल्कभरणा अशा विविध स्वरुपाची मदत शिक्षकांसोबत शाळेचे हितचिंतक व देणगीदार करत असतात. गेले दीड वर्ष कोरोनाच्या काळातही याचे प्रत्यंतर आले. पूर्ण शाळा व्यवस्थित ऑनलाईन स्वरुपात कार्यरत होती. विद्यार्थ्यांना अगदी रिचार्ज करुन देण्यापासून ते मोबाईल देण्यापर्यंतची मदत करुन शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जाण्यापासून थांबवले गेले. अनेक स्पर्धा ऑनलाईन स्वरुपातही घेतल्या गेल्या.

साठ वर्षे पूरी होताना विद्यार्थ्यांसाठी केल्या जात असलेल्या या सर्व गोष्टी आठवतात. त्याचप्रकारे मराठी शाळांचे बंद पडणे, सांस्कृतिक चंगळवादी आक्रमणे, माध्यमांचा नको तेवढा पडलेला विळखा व त्यातून निर्माण होणारी प्रलोभने अशी अनेक आव्हानेही दिसतात. पण असे म्हणतात ना की, थांबलो की सगळे थांबते; पण पुढे जाणाऱ्याला अडथळे येतात, पण मार्गही सापडतो. शाळेलाही हाच विश्वास आहे. संस्था, देणगीदार, हितचिंतक, माजी विद्यार्थी, शिक्षक आणि पूर्ण समाज पाठिशी आहे मग चिंता कसली !

**संदिप गिध**
८४२४९ ५२००२

## पारले साहित्य कट्टा : पुन्हा प्रारंभ

साहित्य प्रेमी अशोक बेंडखळे आणि माधवी कुंटे यांच्या पुढाकारातून पारले साहित्य कट्टा अडीच वर्षांपूर्वी सुरु झाला होता, तीन बैठकीनंतर कोरोनामुळे तो थांबवावा लागला. आता मे महिन्यापासून नव्या उत्साहाने पुन्हा सुरु झाला, स्थळ: मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, हनुमान रोड विलेपार्ले पूर्व. बैठकीला १५ जण उपस्थित होते, संध्याकाळी ६ ते ८ अशा दोन तासात रंगलेल्या गप्पांमध्ये सदस्यांनी दोन वर्षात केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडला, साहित्य प्रेमींच्या विचारांचे आदानप्रदान सुखद होते. उपस्थित सदस्य असे: माधवी कुंटे, शर्मिला फडके, मंजिरी वैद्य, सविता दामले, दीपा मंडलिक, मुकुंद सराफ, सदानंद डबीर, विजयराज बंधनकारक, अल्पना कशाळकर, चारुलता काळे, राजेंद्र मंत्री, रविराज गंधे, प्रदीप पाटील, ज्ञानेश चांदेकर आणि अशोक बेंडखळे



# एक पॅशनेट कलाकार ... योजना शिवानंद!

योजना सप्रे ते योजना शिवानंद हा कलात्मक प्रवास जाणून घ्यायला योजनाताईंकडे गेले तेव्हा दीर्घ गप्पांतून त्यांचं कलाजीवन,त्यातील चढ उतार, तरीही जपलेली उर्जा, सकारात्मकता, कलात्मकता, किस्से, कलाकामातील सततची नवनिर्मिती हे सारं भरभरून ऐकताना....इतकंच जाणवलं...एक पॅशनेट कलाकार म्हणजे योजना शिवानंद!



शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीतातील – नाट्यसंगीत, गझल आणि अभंग, स्वत:च्या आवाजात तसंच शैलीत गाणारी सुप्रसिद्ध गायिका, चांगली अभिनेत्री आणि कलाप्रांतात आजही नवनवीन प्रयोग धाडसानं करणाऱ्या योजना शिवानंद म्हणजे माहेरच्या योजना सप्रे. वडील प्रभाकर सप्रे, आई सुशीला सप्रे. आजोबांना ( आईचे वडील ) गाण्याचं अतोनात वेड होतं. तेच वेड योजनाताईंमध्ये आलं. आई सुंदर गात असे पण तिनं गाण्याचं रीतसर शिक्षण घेतलेलं नव्हत. सासर सनातनी असल्यानं



आईला लग्नानंतरही गाणं करता आलं नाही. मुंबई आकाशवाणीवर मात्र त्या गात. लेकीवर गाण्याचे प्राथमिक संस्कार आईनेच केले.

दादर हिंदू कॉलनीतील किंग जॉर्ज शाळेत त्यांचं शालेय शिक्षण झालं. शाळेचं वातावरण कलेला पोषक होतं. शाळेच्या नाच, नाटक, गाणं, समूहगान अशा सर्वात योजनाताईंचा सहभाग असे. हिंदू कॉलनीतल्या गणेशोत्सवातही त्यांनी काम केले आहे. अभिनय गुण त्यांच्यात अंगभूत आहेत. इयत्ता ५ आणि ६वीत असताना योजनाताईंनी गांधर्व विद्यालयाच्या पहिल्या दोन परीक्षा दिल्या.

महाविद्यालयीन शिक्षणात त्यांनी टेक्स्टाईल या विषयात बीएससीला प्रवेश घेतला. कॉलेजच्या पहिल्या वर्षात असताना गांधर्वची पुढची गायन परीक्षा दिली.

इंटर सायन्सला असताना मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागात डिप्लोमासाठी प्रवेश घेतला. तेथे संगीत विभागाचे प्रमुख होते डॉ. अशोक रानडे ! या कॉलेजात जयपूर घराण्याचे गुरू पं. निवृत्तिबुवा सरनाईक यांच्याकडे दोन वर्ष गायकी अंगाचं शिक्षण घेऊन शास्त्रीय गायनाचा डिप्लोमा त्यांनी पूर्ण केला.




पं. यशवंत देव सरांची भेट तिथेच झाली. स्वत:च्या आवाजात, स्वत:च्या सुरात आणि स्वत:चे गाणे गा असं ठामपणे सांगणारे हाडाचे शिक्षक म्हणजे पं. यशवंत देव ! सुगम गायनातील योजनाताईंचे ते गुरू आहेत.

मुंबई विद्यापीठात शिक्षण घेताना आलेले सांगीतिक अनुभव समृद्ध करणारे होते. त्यांनी बीएससी टेक्स्टाईलची पदवीसुद्धा पहिल्या वर्गात उत्तीर्ण केली.

पुढे जीवनात अनेक चढ उतार आल्यामुळे आयुष्यभर नोकरी करणं अपरिहार्य होतं. त्यामुळे संगीत साधनेला वेळ देता आला नाही याची खंत त्यांना आजही आहे.

शालेय जीवनात, इयत्ता १० वीत असताना अमोल पालेकरांसारख्या गुणी दिग्दर्शकाच्या सोबत त्यांनी राज्यनाट्य स्पर्धेसाठी 'द्रौपदी' नाटक केलं. पुढे आविष्कारसाठी जयदेव हट्टंगडी यांनी दिग्दर्शित केलेलं 'अबू हसन' नाटक केलं. त्याचे संगीतकार होते शांक-नील !

पुढे महाराष्ट्र राज्य शासनाच्या संगीत नाट्य स्पर्धेसाठी संशयकल्लोळ नाटकात त्यांनी रेवतीची भूमिका केली. ती पदे पं. गोविंदराव पटवर्धन यांनी बसवून घेतली. त्यासाठी प्रतिष्ठेचं रौप्य पदक त्यांना मिळालं. त्यामुळेच पहिलं व्यावसायिक नाटक मिळालं ' महानंदा ' ! ज्याचं संगीत पं. जितेंद्र अभिषेकी यांचं होतं. पंडिता जयमाला शिलेदार आणि पं. चंद्रचूड वासुदेव यांचं मार्गदर्शनही लाभलं आहे. योजनाताई मुंबई आकाशवाणी केंद्राच्या मान्यताप्राप्त कलाकार आहेत.

संगीत, साहित्य आणि रंगभूमीविषयी नव्या आणि अनोख्या संकल्पना घेऊन कार्य करण्यासाठी 'योजना प्रतिष्ठान' ट्रस्टची स्थापना १९८१ मध्ये त्यांनी केली. या संस्थेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथावर आधारित 'भगवान गौतम बुद्ध' या नाटकाची निर्मिती केली. त्यात नितीश भारद्वाज बुद्धाचं काम करीत आणि योजनाताई यशोधरा. हे नाटक खूप यशस्वी होऊन महाराष्ट्रभर त्याचे प्रयोग झाले. पुढे दुसरं नाटक आणलं 'चक्रवर्ती अशोक'. ते अपयशी झाल्यानं मोठा आर्थिक फटका बसला. जीवघेणी मेहनत करून योजनाताईंनी या आर्थिक संकटाला तोंड दिलं. मात्र त्यात आयुष्याची सात मौल्यवान वर्षे खर्च झाली. कष्टप्रद असा तो काळ होता. कालांतरानं पश्चिम रेल्वेत कलाकार म्हणून नोकरी मिळाली. याच काळात 'वात्रट मेले' या विनोदी नाटकातही त्यांनी काम केलं. तणावपूर्व आयुष्यावर विनोदाचा हा उत्तम उतारा होता. विपरीत परिस्थितीत संगीत शिक्षण चालू ठेवत त्यांनी सं. विशारद आणि सं. अलंकार या दोन्ही परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण केल्या.

रेल्वेत नोकरी करत असताना ८८ साली शिवानंद पाटील या कलाकार तरुणाशी ओळख झाली. कर्नाटकातून आलेले शिवानंद मध्य रेल्वेत नोकरी करत होते आणि अभिषेकी बुवा आणि यशवंत बुवांकडे गाणं शिकत होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आलेले ते उत्कृष्ट कलावंत तसंच उत्तम माणूस होते. कार्यक्रम ठरविण्याच्या निमित्तानं ओळख झाली आणि लगेच शिवानंद यांनी त्यांना लग्नाची मागणी घातली. लग्न झालं आणि



समरसून संसार सुरू झाला. त्यानंतर शिवानंदजींच्या करियरला बहर आला. पुणे सवाई गंधर्व, नेहरू सेंटरचा मल्हार फेस्टीवल, रेकॉर्डिंग्स असा मोठा संगीत प्रवास सुरू झाला. आत्मा गाण्यात असल्यानं नोकरी सांभाळून



मैफिली करणं त्यांना अवघड झालं. योजनाताईंनी त्यांना नोकरी सोडून गाण्यावर लक्ष केंद्रित करायला सांगितलं. स्वत:चं करियर सोडून देऊन, अखेरपर्यंत नोकरी करून घर सांभाळत त्या शिवानंदजींच्या पाठीमागे खंबीरपणे उभ्या राहिल्या.

पं. शिवानंद पाटील यांच्या प्रेरणेमुळे योजना प्रतिष्ठानचं काही काळ थांबलेलं काम पुन्हा सुरू झालं.

रेल्वेची पेन्शन मिळणारी कायमस्वरूपी सरकारी नोकरी सोडून योजनाताई यांनी संगीताच्या कॉर्पोरेट क्षेत्रातील अस्थिर नोकरी स्विकारण्याचा धाडसी निर्णय घेतला. भारतातील अग्रगण्य रेकॉर्डिंग कंपनी सारेगामा इं. लि. म्हणजे एचएमव्ही मध्ये १९९४ मध्ये रेकॉर्डिंग ऑफिसर म्हणून त्या नोकरी करू लागल्या. शास्त्रीय संगीत आणि मराठी विभागात सिनियर मॅनेजर म्हणून त्या एकूण २०वर्षं कार्यरत होत्या. त्यांच्या सर्जनशीलतेतून अनेक ऑडिओ अल्बम्सची निर्मिती झाली आहे. रागा रिफ्लेकशन, ठुमरी रंग, खयाल, वर्सेटाईल जीनियस, बेस्ट ऑफ भजन, विंटेज 78 आरपीएम, जीवनगाणे, द कम्प्लिट वर्क्स आणि समग्र अशा दर्जेदार ब्रॅण्ड्स अंतर्गत त्यांनी दिग्गज कलाकारांची दुर्मिळ रेकॉर्डिंग्ज रसिकांना उपलब्ध करून दिली.भारतरत्न लता मंगेशकर, भारतरत्न पं. भीमसेन जोशी, पं. हृदयनाथ मंगेशकर, पं शिवकुमार शर्मा, गुलजार साहेब अशा अनेक दिग्गजांबरोबर काम करण्याचं भाग्य त्यांना लाभलं आहे.

शिवानंद यांच्या ५० व्या वाढदिवसाला 'शिवगंधार' या कंपनीची स्थापना करून २००९ मध्ये त्यांच्या वाढदिवसाचा भव्य सोहळा आयोजित करून देखण्या गौरविकेचे प्रकाशन केले .

१९९२ साली 'देवदयानिधी' या अभंगवाणीतून योजना प्रतिष्ठान संस्थेचा आषाढी एकादशीचा उपक्रम सुरू केला.या अखंड सेवेत गेल्या ३० वर्षांत ३३ मैफिली झाल्या. आज त्यांचं अनुकरण अनेकांनी केलेलं दिसून येत.योजना प्रतिष्ठानच्या आषाढीचं वैशिष्ट्य असं की दरवर्षी नवी अभंगवाणी आणि त्यात रेकॉर्डेड गाणी न गाता त्या नवे अभंग गातात.

शिवानंद यांच्या अकाली निधनानंतर हा उपक्रम फार खंबीरपणे त्यांनी सुरू ठेवला. त्यात जनी म्हणे, आदिमाया मुक्ताई, ताटी उघडा ज्ञानेश्वर, अभंगप्रिया अशा वेगळ्या मैफिली घडवल्या. हे विशेष उल्लेखनीय आहे.

यावर्षी १० जुलैला साहित्य संघात ३१ व्या वर्षातील ३४ वी नवीन, अनोखी अभंगवाणी होणार आहे.

आषाढी- भक्तिसंगीताची 'रौप्यमहोत्सवी वारी' , 'अम्लान- कवितासंग्रह', 'आषाढी- संतकाव्याचा अनोखा रंग' आणि 'स्वरमंजूषा' ही चार पुस्तकं योजनाताईंनी लिहिली आहेत.

आजच्या डिजिटल युगाचे भान ठेऊन ते माध्यम अवगत करून 'योजना शिवानंद ऑफिशिअल' हे यूट्यूब चॅनल त्यांनी सुरू केलं आहे. त्या चॅनलवर गायनाचे ३०० अनोखे व्हिडिओ आपण पाहू शकता.

मुलाखत संपताना त्यांची मैत्रीण मराठी भाषेची व्यासंगी अभ्यासक प्रा. मीना गोखले यांचा एक एसेमेस त्यांनी मला दाखवला – 'योजना म्हणजे पॅशन, पेशन्स आणि परफेक्शन !' असं त्यांनी म्हटलं होतं.वरील तीन वैशिष्ट्यपूर्ण `P' सोबत अजून एक पॉवरफुल `P' त्यांच्यात आहे `P' फॉर पाटील !

अम्लान – अनोख्या, अलग – असीम, निरपेक्ष – चैतन्यमयी अशा त्यांना, सतत ईश्वरी प्रेरणा तसंच निकोप निरोगी उत्तम आयुरारोग्य लाभो !

**अनुश्री क्षीरसागर**
९८२०५०९७६२

# इर्सल

मराठी चित्रपट आणि राजकारणाविषयी केलेलं भाष्य हे आपण सिंहासन ,सरकारनामा, झेंडा अशा विविध चित्रपटातून पाहिलंय. याच महिन्यात राजकारणाची पार्श्वभूमी घेऊन 'इर्सल' नावाचा मराठी चित्रपट सुद्धा प्रदर्शित होतआहे. स्थानिक राजकारण आणि विविध समाजघटकांवर या राजकीय घडामोडींचा




होणारा परिणाम यांची झलक 'इर्सल' मध्ये पहायला मिळणार आहे. अगदी टीनएजर्स मुलांपासून राजकारणातील बुजुर्ग नेत्यांपर्यंत निवडणूक काळात नेमकं काय काय घडतं हे या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

राजकारणातील कावेबाज माणसांच्या ईर्षेची धूळवड या चित्रपटातून आपल्यासमोर येणार आहे.

भलरी प्रोडक्शनची निर्मिती आणि राज फिल्मची प्रस्तुती असलेल्या 'इर्सल' या चित्रपटाचे दिग्दर्शन अनिकेत बोंद्रे - विश्वास सुतार यांनी केले आहे. 'राजकारणात गुलाला शिवाय मज्जाच नाय' हे या चित्रपटाच्या पोस्टरवरील वाक्य पण लक्ष वेधून घेत आहे.

'इर्सल' चित्रपटात डॉ. मोहन आगाशे, शशांक शेंडे, अनिल नगरकर, सुजाता मोगल, अभिनेत्री माधुरी पवार, शरद जाधव, अजिंक्य निकम, विश्वास सुतार, संजय मोहिते, आदर्श गायकवाड, दिग्विजय कालेकरअशा अनेक कलाकारांच्या भूमिका आहेत. तर ट्रेलर आणि गाण्यांमधून लक्ष वेधून घेणारी विक्रम सूर्यकांत

आणि शिवानी मोझे पाटील ही फ्रेश जोडी पदार्पण करत आहे.

अनिकेत बोंद्रे - विश्वास सुतार दिग्दर्शित 'इर्सल'चे निर्माते विनायक आनंदराव माने व प्रस्तुतकर्ता सूरज डेंगळे आहेत. 'नाद करायचा नाय' फेम संगीतकार दिनकर शिर्के 'इर्सल'चे गीत – संगीतकार आहेत. चित्रपटातील गीते उर्मिला धनगर, पूरण शिवा, गुल सक्सेना, शाहीर लक्ष्मण पवार यांनी गायली आहेत. तर नृत्य दिग्दर्शक धैर्यशील उत्तेकर आहेत. कथा अनिकेत बोंद्रे यांची असून, पटकथा अनिकेत बोंद्रे व महेशकुमार मुंजाळे यांची, तर संवाद विश्वास सुतार यांचे आहेत.




# फनरल

प्रत्येक जण आपल्या आयुष्यात स्थिरस्थावर होण्याचा प्रयत्न करत असतो, पण कोणाचे आयुष्य कुठे काय वळण घेऊन येईल सांगता येत नाही. 'हिरा' हा असाच एक युवक आहे. रोजच्या धकाधकीच्या जीवनात स्थैर्यासाठी तो धडपडत आहे.

त्याच्या जोडीला त्याचे सदा,सूर्या आणि विनोद हे मित्र सुद्धा आहेत.

प्रयत्न करुनही योग्य ती नोकरी, व्यवसाय मिळत नसल्याने कुटुंबाकडून, समाजाकडून होणाऱ्या



सततच्या अवहेलनेला कंटाळून हे सगळे एक जगावेगळा व्यवसाय निवडतात. आनंदासाठी, समाधानासाठी आयुष्यभर झटणाऱ्या माणसांचा शेवटही आनंददायी व्हावा यासाठी ते प्रयत्न करतात. त्यात त्यांना यश मिळतं का? खरंच आयुष्याचा शेवट गोड होऊ शकतो का? या सगळ्याची उत्तर 'फनरल' चित्रपट देणार आहे. वेगवेगळ्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये नाव कोरणारा हा चित्रपट नक्कीच वेगळा विचार देऊन जाणारा ठरेल.

जगण्यासोबत मरणाचाही आनंदोत्सव करण्याचा कानमंत्र देणारा 'बीफोर आफ्टर एंटरटेन्मेंट' प्रस्तुत 'फनरल' हा मराठी चित्रपट १० जूनला चित्रपटगृहांत येत आहे. सिनेसृष्टीची पार्श्वभूमी नसलेल्या लेखक-निर्माते रमेश दिघे व दिग्दर्शक विवेक दुबे या जोडीनं एक छान सामाजिक कथा 'फनरल' चित्रपट रूपात मांडली आहे. आयुष्याकडे बघण्याचा अगदी वेगळा विचार घेऊन आलेल्या 'फनरल' चित्रपटात आरोह वेलणकर, तन्वी बर्वे, विजय केंकरे, संभाजी भगत, प्रेमा साखरदांडे, हर्षद शिंदे, पार्थ घाटगे, सिद्धेश पुजारे यांच्या भूमिका आहेत.अभिनेता आरोह वेलणकर म्हणतो, 'माझी यातील भूमिका आणि हा चित्रपट प्रत्येकाला खूप काही देईल. माझ्या वाट्याला ही भूमिका आली त्याबद्दल मी स्वत:ला खूप भाग्यवान समजतो'. या चित्रपटाला अनेक ठिकाणी अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

'फनरल'च्या प्रमोशनसाठी एक भला मोठा कावळा बनवण्यात आला आहे. हा कावळा पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्येही चर्चेचा विषय ठरला होता आणि इफ्फीमध्येही रेड कार्पेटवर चालूनही त्यांनं अनेकांचं लक्ष वेधून घेतलंहोतं.आरोहनं चित्रपटात या कावळ्याचं नाव 'मार्टिन' ठेवलं आहे.चित्रपटातील 'मार्टिन क्रो' आता प्रेक्षकांच्याही भेटीगाठी घेत आहे. आता या चित्रपटाला प्रेक्षकही भरपूर प्रतिसाद देतील असं वाटत आहे.

**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

# पुणे भारत गायन समाज - एक सुरेल स्वरयात्रा
# ११० वर्षांचा सांगीतिक प्रवास

एक सप्टेंबर १९११ रोजी 'किर्लोस्कर नाटक मंडळी'च्या पुढाकारानं 'देवगंधर्व' कै. पं. भास्करबुवा बखले यांनी पुण्यात 'किर्लोस्कर भारत गायन समाज' या संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील ही एक महत्वाची घटना आहे. बाजीराव रस्त्यावर, शनिपाराजवळ या संस्थेची इमारत भास्करबुवांच्या स्मारकाच्या रूपात उभी आहे. परंतु त्यांच्या कार्याची, ध्येय-धोरणांची साक्ष देत संस्था आजही कार्यरत आहे, हे त्यांचं खरं स्मारक आहे. १९४० पासून आजतागायत संस्था 'पुणे भारत गायन समाज' या नावानं कार्यरत आहे.

हे लेखन संस्थेच्या कार्यापुरतं मर्यादित ठेवलेलं नाही, तर एका व्यापक कालखंडाशी जोडण्याचा लहानसा प्रयत्न केला आहे. विविध नात्यांनी संस्थेशी संबंधित असलेल्या नामवंत कलाकारांची अत्यंत संक्षिप्त चरित्रं, त्यांना लाभलेल्या पार्श्वभूमीसह दिलेली आहेत. उदाहरणार्थ, 'देवगंधर्व' भास्करबुवा बखले यांच्या चरित्र प्रकरणापूर्वी लिहिलेली दोन प्रकरणं म्हणजे हिंदुस्थानी संगीताचा उगम, ते घराण्यांच्या गायकीपर्यंतचा हजारो वर्षांचा प्रवास आहे. या प्रवासाचा पुस्तकाच्या मर्यादेत स्थूलमानानं घेतलेला आढावा आहे.

त्याचप्रमाणे शंकरबुवा अष्टेकर, रावसाहेब केळकर, गोविंदराव टेंबे, बापूराव केतकर, बालगंधर्व, आग्रेवाले विलायत हुसेन खाँसाहेब, मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर, प. राम मराठे, स्वरराज छोटा गंधर्व, पंडिता शैला दातार, सरदार आबासाहेब मुजुमदार... असे संस्थेचे आधारस्तंभ आणि अध्यक्षांचा थोडक्यात परिचय दिला आहे. त्यांनी 'समाजा'साठी केलेलं कार्य आणि त्यांच्या लोकप्रियतेचा संस्थेला झालेला उपयोग अशा दोन्ही अंगानं लेखन केलं आहे.

या नामवंतांबरोबरच ज्यांना फारशी प्रसिद्धी मिळाली नाही असे साधेसुधे कार्यकर्ते, शिक्षक, ज्यांनी कशाचाही लोभ न धरता आपलं ऐन उमेदीचं आयुष्य 'समाजा'च्या मुळाशी शिंपलेलं आहे त्यांचाही प्रातिनिधिक स्वरूपात पुस्तकात उल्लेख आहे. अशा सर्वांनी मिळून संस्था जपली, जोपासली आणि वाढवली. आज 'संगीत विद्यापीठ' म्हणून संस्थेचा जो गौरव होत आहे तो अशा सर्व कर्मयोग्यांमुळेच.

स्थापनेपासूनच संस्था आर्थिक संकटात घेरलेली होती. एका क्षणी सारं काही संपलं असं वाटत असतानाच पुन्हा उभारी घेऊन संस्थेनं मजल दरमजल करत ११० वर्षांचा प्रवास पूर्ण केला आहे. आणि या पुढेही तो चालू राहणार आहे. प्रवासातील अनेक घटना-उपक्रमांची नोंद पुस्तकात घेतली आहे. उदा. 'भास्कर संगीत विद्यालया'ची स्थापना, मास्तर कृष्णराव यांनी तयार केलेला 'पारंगत' पर्यंतचा अभ्यासक्रम, प्रकाशित केलेली पुस्तकं, सुसज्ज ग्रंथालय, दुर्मिळ ध्वनिमुद्रणाचं जतन, ते ऐकण्यासाठी स्वतंत्र कक्ष, अभ्यासपूर्ण कार्यक्रम-मुलाखती-चर्चा. याबरोबरच मान्यवरांच्या संस्थेसंदर्भातल्या आठवणींचा समावेशही पुस्तकात केला आहे.



महत्वाचं म्हणजे, संस्था कुणा एकाची न राहता अनेकांची होत गेली. व्यक्तीपेक्षा संस्था मोठी, या विचारामुळे दृश्य-अदृश्य अनेक हात मदतीसाठी पुढे येत गेले. ते काही रूजवण्यासाठी आणि रूजवलेलं टिकवण्यासाठी. म्हणूनच महाराष्ट्राच्या संगीत विश्वातील या प्रमुख संस्थेचा इतिहासवजा प्रवास महाराष्ट्राच्या सांगीतिक वाटचालीचा काही प्रमाणात दस्तऐवज आहे.

**पुणे भारत गायन समाज,**
**एक सुरेल स्वरयात्रा**
**राजहंस प्रकाशन, पुणे**
**लेखिका : शैला मुकुंद**
**विशेष मार्गदर्शन : निर्मला गोगटे**

**शैला मुकुंद**
९८८१४ ६२६५०




*Want to learn car driving easlly ?*

*Own a car, have a driving license but no confidence to drive in traffice !!*

*You must be in search of a perfect driving instructor !! If yes, you are at right place... your personal & dedicated instructor will teach you lessons for perfect driving*

**For More Information Contact**
**Sanjay Chavan. 8108048239 / 8850686346**

# ‘अर्बन टेरेस फार्मिंग’ तर्फे जागतिक पर्यावरण दिन साजरा

५ जून, जागतिक पर्यावरण दिवस. सगळीकडे साजरा होत असताना आम्हीही आमचा खारीचा वाटा द्यायचे ठरवले. आता आम्ही म्हणजे कोण तर सम विचारी व उत्साही



पार्लेकरांचा एक ग्रुप, ‘‘अर्बन टेरेस फार्मिंग’’.

आम्ही सावरकर केंद्राच्या गच्चीवर सहभागातून शेती हा उपक्रम गेली ४ वर्षे चालवत आहोत. मधे कोरोनामुळे थोडी खीळ बसली होती पण आता परत पूर्वीच्याच जोमाने काम सुरू झाले आहे. यामधे आम्ही इतर शहरी लोकांना बागकाम व शेतीकामाची आवड आहे अशांसाठी ३ महिन्याचे कोर्सेसही यशस्वीरित्या घेतले. पुढची बॅच बहुदा ऑक्टोबरमधे सुरू होईल. आता हे झाले आमच्याबद्दल.

तर ५ जून रोजी आम्ही कार्यकर्ते ७।। वाजता सावरकर केंद्राच्या गच्चीवर हजर होतो. आमचे नगरसेवक श्री. अभिजित सामंत हे सुद्धा उपस्थित होते. आज सगळ्यांनाच वृक्षरोपणाचे महत्व माहिती आहेच पण श्री. चंद्रकांत लट्टू सर व श्री. श्रीकांत सावरकर सर यांनी देशी व विदेशी झाडे यांची तुलना करून, शहरामधे कोणती झाडे व कोणत्या प्रकारे लावावी, कशा पद्धतीने लावावी, जेणेकरून त्यांचा कुणालाच त्रास होणार नाही याबद्दल सविस्तर व उपयुक्त माहिती दिली. देवराई, मियावाकी जंगलं याबद्दलही माहिती सांगितली. त्याचप्रकारे वेगवेगळ्या झाडांचे वेगवेगळे गुणधर्म, त्यांचे आयुर्वेदिक महत्वही सांगितले. काही लोकांच्या झाडाबद्दलच्या शंकांचे निरसनही दोघांनी केले. जमलेल्या सर्वांना ही माहिती उपयुक्त झाली.

अतिशय अनौपचारीक असा हा कार्यक्रम दिड तास चालला व बरीचशी नवी माहिती कळून लोक घरी गेले.

**वर्षा करंबेळकर**







